**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
१९ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०००३२.

क्रमांक: साप्रवि- १२०२२/१७/२०२६-साप्रवि(कक्ष-६)		दिनांक:- १२ जून, २०२६.

**प्रति,**

सचिव / उप सचिव (क्षेत्रीय आस्थापना),
सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
मंत्रालय, मुंबई.

**विषय :-** सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील राज्य माहिती आयोगातील विविध रिक्त पदे प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत मुदतवाढ देणे.
**संदर्भ :-** या विभागाचे पत्र क्र. साप्रवि-१२०२२/१७/२०२६-माहिती (कक्ष-६), दि. ०२.०४.२०२६.

महोदय / महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये राज्य माहिती आयोगाच्या विविध कार्यालयांमधील उप सचिव, कक्ष अधिकारी व सहाय्यक कक्ष अधिकारी ही पदे प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी राज्य शासनाच्या कोणत्याही कार्यालयातील उप सचिव/कक्ष अधिकारी/सहायक कक्ष अधिकारी या पदांचे समतुल्य पद धारण करणाऱ्या इच्छुक व पात्र अधिकारी / कर्मचाऱ्यांकडून दि.०५.०५.२०२६ पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. तथापि, सदर पदांकरिता अपेक्षित संख्येने इच्छुकता / प्रस्ताव प्राप्त झालेले नाहीत. यास्तव, अधिकाधिक पात्र अधिकारी / कर्मचाऱ्यांना अर्ज सादर करण्याची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सदर जाहिरातीस पुढील **एक महिन्यांची म्हणजेच दि.१२.०७.२०२६ पर्यंत मुदतवाढ** देण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातील उप सचिव/कक्ष अधिकारी/ सहायक कक्ष अधिकाऱ्यांची पुढील तक्त्यातील रिक्त असलेली पदे राज्य शासनाच्या कोणत्याही कार्यालयातील उप सचिव/कक्ष अधिकारी/सहायक कक्ष अधिकारी या पदांचे समतुल्य पद धारण करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने भरावयाची आहेत.

| **अ. क्र.** | **पदनाम व वेतनस्तर** | **राज्य माहिती आयोगाचे कार्यालय व भरावयाची पदसंख्या** | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **मुख्यालय, मुंबई** | **बृहंन्मंबई** | **पुणे** | **कोंकण** | **छत्रपती संभाजी नगर** | **अमरावती** | **नागपूर** | **नाशिक** |
| १ | उप सचिव (एस -२५) | - | १ | - | - | - | - | - | १ |
| २ | कक्ष अधिकारी (एस- १७) | १ | २ | २ | १ | २ | २ | १ | - |
| ३ | सहायक कक्ष अधिकारी (एस -१४ ) | २ | ३ | २ | ४ | २ | ४ | २ | ४ |
| **एकूण** | | **३** | **६** | **४** | **५** | **४** | **६** | **३** | **५** |

३.	सदर जाहिरातीनुसार इच्छुक व पात्र अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांचे अर्ज मूळ प्रशासनिक विभागामार्फत या विभागाकडे **दि. १२.०७.२०२६ पर्यंत** सादर करावेत तसेच सदर अर्जाची एक अगाऊ प्रत या कार्यासनास सादर करावी. अर्जाची आगाऊ प्रत प्राप्त झाल्यास संबंधित अधिकारी यांना ना-हरकत देण्याबाबत या विभागामार्फत त्यांच्या प्रशासकीय विभागास विनंती करण्यात येईल.

४.	संदर्भीय पत्रातील इतर सर्व अटी व शर्ती यथावत राहतील. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी सदर मुदतवाढीची सूचना त्यांच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या निदर्शनास आणून द्यावी.

५.	सदर शासन पत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२६०६१२१३०४४६२३०७ असा आहे. हे पत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

आपला,

Digitally signed by HEMANT ANANT MAHAJAN
Date: 2026.06.12 13:13:50 +05'30'

**(हेमंत महाजन)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत :- संग्रहार्थ, कार्यासन-६.